## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष (CTPC) आणि जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (वेस्टर्न रिजन), मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी 'करिअर मार्गदर्शन कार्यक्रम' दि. ११ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास १६५विद्यार्थी उपस्थित होते

कार्यक्रमासाठी बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग (Western Region), मुंबईचे असिस्टंट डायरेक्टर तथा असिस्टंट सेंट्रल अप्रेंटिसशिप ॲडव्हायझर श्री. निखिल सी. गांगडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. हया कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एम. एस. रघुवंशी हे होते तर प्रमुख निखिल सी. गांगडे हे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. एम. आर. पाटील यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. एस. पाटील यांनी केले. यावेळी श्री. संदीप कुमार (इंटर्नशिप कोऑर्डिनेटर), श्री. तुषार वानखेडे (सहाय्यक प्राध्यापक), डॉ. एस. पी. पाटील आणि डॉ. एम. आर. पाटील यांची उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना श्री. निखिल सी. गांगडे यांनी विद्यार्थ्यांना National Apprenticeship Training Scheme (NATS), अप्रेंटिसशिपच्या संधी आणि कौशल्याधारित रोजगाराच्या विविध संधींबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कौशल्य यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी अप्रेंटिसशिपचे महत्त्व स्पष्ट केले. NATSच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यस्थळी प्रशिक्षण, उद्योगाभिमुख कौशल्ये, स्टायपेंड तसेच कामाचा अनुभव मिळतो, त्यामुळे त्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०मध्ये उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविणे, कौशल्यविकासाला प्रोत्साहन देणे तसेच शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यात सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अप्रेंटिसशिप विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे श्री. गांगडे यांनी नमूद केले.

NATS ही भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाची महत्त्वपूर्ण योजना असून, विद्यार्थ्यांना 'ऑन-द-जॉब' प्रशिक्षणाद्वारे उद्योगासाठी आवश्यक व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते. तसेच अप्रेंटिसशिप प्रशिक्षणाचा अनुभव विद्यार्थ्यांच्या भविष्यातील रोजगारासाठी उपयुक्त ठरतो, यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी विशेष प्रयत्न केले. हा कार्यक्रम डॉ. राजेश जावळेकर, प्रा. उज्वल पाटील आणि प्रा. रमेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात होता.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. १२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, रसायनशास्त्र प्रशाळेत या वर्षी प्रथमच एम. एस्सी. इन केमिस्ट्री रबर टेक्नॉलजी या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. केंद्र शासन संचलित प्रतिष्ठित इन्टिटयूट ऑफ रबर मटेरियल्स ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट (आय.एम.आर.आय.) ठाणे यांच्या सोबत झाला असून यासाठी स्थायनशास्त्र प्रशाळेमध्ये वरील विषयासाठी दि. १४ ऑगस्ट पर्यंत प्रवेश देण्यात येणार आहे.

या वर्षी प्रथमतः एम. एस्सी. इन केमिस्ट्री रबर टेक्नोलॉजी या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यात प्रथम वर्ष हे रसायनशास्त्र प्रशाळेतील इतर विषयांबरोबर करता बाणार आहे तर व्दितीय वर्ष हे ठाणे येथील इन्टिटयूट ऑफ रबर मटेरियल्स ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट (IRMRI) या संस्थेत करण्याची संधी ही आपल्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. इन्टिटयूट ऑफ रबर मटेरियल्स ॲण्ड रिसर्च इन्स्टीट्यूट (IRMRI) ही संस्था केंद्र सरकारचा उपक्रम असून देशातील रबर संशोधनातील अग्रनीय संस्था आहे. या संस्थेत काम करणारे तथापि या विद्यार्थ्यांना शिकविणारे प्राध्यापक हे कौशल्य आधारीत प्रगत तत्रज्ञांशी संबधीत आहे. या संशोधनाला प्रयोगशाळेतील कंपनी स्तरावरील अद्ययावत उपकरणे तथा यंत्र सामुग्री पाहण्याची व त्यावर काम करण्याची संधी या निमित्ताने विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. या उपकरणांमध्ये पृथकरणीय उपकरमा अत्यंत महागडे व अद्ययावत उपकरणे जसेकी TGA, DSC, Tensin, Testing, Rheometer इ. चा समावेश आहे. तर उत्पदनावर आधारित उपकरणे Injection Moulding, Compression Moulding, two roll mill इ. वर विद्यार्थ्यांना काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त होणार आहे.

त्यामुळे मुलांच्या कौशल्यात वाढ होऊन त्यांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतात. यात व्दितीय वर्षात विद्यार्थी IRMRI मध्ये Theory व प्रात्यक्षिक घेण्यात येणार आहे. या दरम्यान विद्यार्थी हे विविध कंपन्यांच्या संशोधन कार्यात सहभाग नोंदवू

शकतात. त्यामुळे त्यांना कंपन्यांमध्ये सुरु असलेल्या संशोधनाची दिशा माहीत होऊ शकते व त्यानुसार ते आपले ज्ञान अद्ययावत करु शकतात.

यामुळे विद्यार्थ्यांना Placement मिळण्यास पुरेपुर वाव असल्याचे प्रशाळेचे संचालक प्रा. दिपक एस. दलाल, प्रा. विकास गिते, प्रा. ए. एम. पाटील यांचे मत असून या मुलांना मिळणारे पॅकेज सुध्दा ५ ते ६ लाख रुपयांपर्यंत दरवर्षी प्रमाणे मिळू शकते

सदर विषयाच्या काही जागा रिक्त असल्याने विद्यार्थ्यांना अवाहन करण्यात येते की, त्यांनी स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस प्रशाळा, कवचौउमवि, जळगाव येथे लवकरात लवकर संपर्क करावा.

**बातमी नं.३**

जळगाव, दि. १२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळा मध्ये दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रीय दूरसंवेदन दिनानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्रख्यात भारतीय अंतराळ वैज्ञानिक डॉ. विक्रम साराभाई यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. यामधून विद्यार्थ्यांना भारताच्या अंतराळ संशोधनातील डॉ. साराभाई यांचे योगदान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि दूरदृष्टीची माहिती मिळाली. यावेळी दूरसंवेदन व भू-अवकाशीय तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. दूरसंवेदन, GIS, GPS, उपग्रह तंत्रज्ञान तसेच कृषी, जलसंपदा, भूजल, पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापनातील त्याच्या उपयोगांवर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला. दूरसंवेदन व भू-अवकाशीय तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जाण निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. हा कार्यक्रम प्रशाळेचे संचालक प्रा. संजय अत्तरदे यांच्या मार्गदर्शनाखाली व विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. एम. रोकडे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

……………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ११ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

ज

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव, दि. १२ ऑगस्ट २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्रातर्फे ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यापीठाच्या समृद्ध ग्रंथसंपदेचा अधिकाधिक उपयोग करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये ग्रंथवाचनाचे महत्त्व अधोरेखित करत ते म्हणाले, "ग्रंथ हे ज्ञानाचे भांडार असून वाचन ही ज्ञानाकडे जाण्याची वाट आहे." नियमित ग्रंथवाचनामुळे ज्ञान, विचार, संस्कार आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्यामुळे प्रत्येकाने दररोज काही वेळ ग्रंथवाचनासाठी द्यावा, असे त्यांनी सांगितले. ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवनकार्याची माहिती देत ग्रंथालय शास्त्रातील पंचसूत्रांची माहिती उपस्थितांना दिली.

ग्रंथ प्रदर्शनात विविध ज्ञानशाखांतील संदर्भग्रंथ, अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तके, स्पर्धा परीक्षा साहित्य, संशोधनपर ग्रंथ तसेच विविध विषयांवरील दर्जेदार साहित्य प्रदर्शित करण्यात आले. विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापकांना त्यांच्या अध्ययन व संशोधनासाठी उपयुक्त ग्रंथांची माहिती या प्रदर्शनातून मिळाली. विद्यापीठातील ज्ञानाचा प्रसार, वाचनसंस्कृतीला चालना देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथवाचनाची आवड निर्माण करणे हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश आहे. विद्यापीठातील विविध शैक्षणिक प्रशाळांचे संचालक, अधिकारी, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट देऊन विविध विषयांतील ग्रंथांची माहिती घेतली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय आहेर, डॉ. नीलिमा म्हसके, विजय पाटील तसेच ज्ञान स्रोत केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**बातमी नं.२**

तिरंगा महोत्सव, सेल्फी विथ तिरंगा, रांगोळी, वक्तृत्व, भित्तीपत्रक व प्रश्नमंजुषा स्पर्धेतून देशभक्तीचा जागर जळगावः मा. राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना मंत्रालय कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, मा. प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रादेशिक संचालनालय, पुणे तसेच मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये विद्यापीठाशी संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) एककांच्या माध्यमातून दि. ०९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'हर घर तिरंगा अभियान-२०२६' उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात येत आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या पावन पर्वाची चाहूल लागली असतानाच देशाच्या स्वातंत्र्याचा गौरव, राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि राष्ट्रध्वजाविषयी आदराची भावना जनमानसात अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून विद्यापीठ परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण होत असून, तिरंग्याच्या तीन रंगांमधून त्याग, शांती, समृद्धी आणि राष्ट्राच्या अखंड प्रगतीचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या अभियानांतर्गत दि. ०९ ते १७ ऑगस्ट २०२६ दरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसर व विद्यापीठाशी संलग्नित सर्व राष्ट्रीय सेवा योजना एककांच्या माध्यमातून विविध नाविन्यपूर्ण व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तिरंगा महोत्सव, 'सेल्फी विथ तिरंगा', रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा, प्रश्नमंजुषा आदी उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, वक्तृत्वाला, सर्जनशीलतेला आणि सामान्य ज्ञानाला व्यासपीठ मिळत असून, त्याचबरोबर राष्ट्रप्रेमाची भावना अधिक बळकट होत आहे. विशेषतः रांगोळी व भित्तीपत्रकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून स्वातंत्र्यलढ्याचा गौरवशाली इतिहास, भारतीय संविधानाची मूल्ये, राष्ट्रीय एकात्मता आणि तिरंग्याचे महत्त्व यांचे कलात्मक सादरीकरण केले जात आहे. वक्तृत्व स्पर्धेतून युवकांच्या विचारांना अभिव्यक्तीची संधी मिळत असून, प्रश्नमंजुषेच्या माध्यमातून स्वातंत्र्यसंग्राम, भारतीय राष्ट्रध्वज आणि देशाच्या गौरवशाली परंपरेविषयी विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'सेल्फी विथ तिरंगा' सारख्या उपक्रमातून युवा पिढीला या राष्ट्रीय अभियानाशी डिजिटल माध्यमातून जोडले जात आहे.

दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन सदस्य श्री. राजेंद्र नन्नवरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यापीठ प्राधिकरणाचे सर्व सन्माननीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवर राष्ट्रीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने तिरंग्याला मानवंदना देत राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचा, स्वातंत्र्याचा आणि अखंडतेचा गौरव करण्यात येणार आहे. याच दिवशी ध्वजारोहणा नंतर राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियान अंतर्गत उपस्थितांना नशामुक्तीची शपत देवून 'तिरंगा रॅली' तसेच 'तिरंगा मानवी साखळी' यांचेही आयोजन करण्यात आले असून, सदर कार्यक्रमास विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा

योजना स्वयंसेवक, अधिकारी, कर्मचारी आणि विविध घटकांचा उत्स्फूर्त सहभाग राहणार आहे अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक डॉ. प्रविण महाले यांनी दिली.

तिरंगा रॅलीच्या माध्यमातून 'राष्ट्र प्रथम' या भावनेचा संदेश देत विद्यापीठ परिसरात देशभक्तीचा जागर करण्यात येणार आहे. तर तिरंगा मानवी साखळीच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि देशाच्या अखंडतेचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. विविधतेत एकता ही भारताची खरी ओळख असून, या एकतेचे प्रतीक असलेल्या राष्ट्रध्वजाभोवती युवकांनी एकत्र येणे ही या अभियानाची विशेष जमेची बाजू ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कक्षातील श्री. शरद पाटील, श्री. कैलास औटी, विलास पाटील, श्री. सौरभ साबळे, आदि परिश्रम घेत आहेत.

..........................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १२ ऑगस्ट, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
ज

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता